# व्यंकटेश माडगूळकरांच्या वास्तवदर्शी प्रतिभेचा आविष्कार 'माणदेशी माणसे'

प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने
मु.जेवनाळा पो. गुरढा
ता. लाखनी जि. भंडारा,
महाराष्ट्र, भारत

*माणदेशी माणसे मधून जीवन वास्तवाचे कलात्मक दर्शन माडगूळकरांनी घडविले आहे. किस्से, हकीकती यांच्याद्वारे मानवी मनाचे विहंगम दर्शन इथे घडते. उच्च प्रतिभाशक्ती, विलक्षण शब्द सामर्थ्य, सरळ, साधी, सोपी भाषा शैली, हुबेहुब वास्तव व्यक्तीरेखाटन हया वैशिष्टयांसह आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत माडगुळकरांच्या 'माणदेशी माणसे' हया निर्मितीने आपले स्वतंत्र असे 'नव'रूप सिध्द केले आहे. म्हणूनच नव कथाकारांत व्यंकटेश माडगूळकरांचे नाव आदराने घेतल्या जाते.*

**प्रस्तावना :-**

नवकथाकारांमध्ये मानाचे स्थान लाभलेल्या व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हयांचा जन्म ६जुलै १९२७ रोजी सांगली जिल्हयातील 'माडगूळ' हया छोटयाशा गावी झाला. अल्पशिक्षण लाभूनही त्यांनी मराठी आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले. प्रतिभा संपन्न आणि हरहुन्नरी अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने मराठी गद्य वाङ्.मयात अजरामर कलाकृती निर्माण केलेल्या आहेत. ११कथासंग्रह, ८कादंबऱ्या,५नाटके,५प्रवासवर्णने, १० ललीत लेखसंग्रह आणि १ आत्मचरित्र त्यांच्या नावावर प्रसिध्द आहेत.

व्यक्तिचित्रणकार कुमार रघुवीर. श्री.म. माटे,वि.द.घाटे,पु.ल. देशपांडे, ग.दि. माडगूळकरां प्रमाणेच व्यंकटेश माडगूळकरांनी इ.स.१९४९ ला 'माणदेशी माणसे' हे (कथा) व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक प्रकाशित केले. या कथासंग्रहातील कथा फारच लक्षवेधी आहेत.

**'माणदेशी माणसे' :-**

प्रस्तुत कथासंग्रहात धर्मा रामोशी, झेल्या, रामा मैलकुली, नामा मास्तर, मुलाण्याचा बकस, बन्याबापू, कोंडिबा गायकवाड, शिदा चांभार, शिवा माळी,तांबोळयाची खाला,रघू कारकून, बाबाखान दरवेशी, गणा महार,माझा बाप नरसूतेली, बिटा काका,गण्या भापटया इत्यादी १६ व्यक्तिमत्त्वांच्या माध्यमातुन कथा साकारल्या आहेत. एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे माडगूळकरांनी हया व्यक्तिमत्त्वांद्वारे कथा निर्मीती केली आहे. इथे माणदेशी माणसांच्या अंतर्मनाचे पापुद्रे अलगदपणे त्यांनी उलगडले आहेत. धर्मा रामोशी हया व्यक्तीचित्रणात्मक कथेत धर्मा रामोशाची कहाणी आहे. झेल्या हे निवेदकाला शिक्षक म्हणून कार्य करतांना भेटलेले लोहाराचे पोर म्हणून दृष्टीस पडते. रामा मैलकुलीच्या व्यक्तिचित्रणात अत्यंत गरीब रामा मैलकुलीची पत्नी त्याला सोडून जाते. विधवा बहिण व भाच्यासोबत तो राहतो. त्याच्या गरीबीची कथा तो निवेदकाजवळ व्यक्त करतो. नामा मास्तर शिक्षकी पेशात न राहता तमाशाच्या जगतात रममाण होतो. मुलाण्याचा बकस निरागस आहे. त्याचे काका-काकू त्याच्यावर अत्याचार करतांना दिसतात. बन्याबापू गावातील तालेवर ब्रहमण . गांधीहत्येच्या जाळपोळीत त्याचा वाडा जळतो. मानी स्वभावाचा बन्याबापू रानात झोपडी बांधून राहतो. कोंडिबा गायकवाड आडदांड स्वभावाचा निवेदकाला खंडाचे पैसे देत नाही. फौजदाराला मात्र लाच म्हणून पाचशे रुपये देतो. संतूची हत्या करुन तुरुंगात जातो. शिदा चांभाराचे इरसाल पात्र निवेदकाला बनविते. पैसे घेऊनही वेळेवर पायतान देत नाही. माती घातलेली पायतान देऊन फसवितो. गांधीहत्येच्या प्रसंगी लोकांची भांडी, वस्तू चोरतो. शिवा माळयाचे पात्र गरीबीमुळे चोरी करणाऱ्याशी सामील होतो. तुरुगांत जातो. त्यामुळे बायको मुलगा त्याला सोडून जातात. निवेदकाजवळ शिवा सर्व प्रांजळपणे कबूली देतो. तांबोळयाची खाला हे

विधवा मुसलमान स्त्रिचे पात्र आहे. गरीब रघू कारकून पत्नीचे व्यभिचारी वर्तन बघून अफू खावून जीव देण्याचा प्रयत्न करतो. बाबाखान दरवेशाचे इरसाल, बेरकी पात्र बायकोला मारझोड करतो. पंरतू अस्वलाला मारत नाही. तमाशाचा नादी गणा महार, अशिक्षित अडाणी, पूर्वपंरपरेची जीवनदृष्टी माननारा नरसू तेली, 'गरीब स्वभावाचा बीटा काका, झटपट श्रीमंत होण्याच्या नादी लागलेला गणा भापटया ही सर्व पात्रे आपल्या सभोवतालच्या परिसरात आजही वावरत आहेत असे वाटावे इतक्या वास्तवदर्शीत्वाने माडगूळकरांनी रेखाटली आहेत.

**'माणदेशी माणसे' मधला माणदेशी परिसर :-**

माडगूळकरांचे 'माडगूळ' हे गाव जून्या आटपाडी संस्थानातले. आता आटपाडी तालुक्याचे ठिकाण आहे. खटाव, माण, कोरेगाव आणि आटपाडी हया चार तालुकांच्या प्रदेशाला 'माणदेश' म्हणतात. दृष्काळातही कुणाकडे हात न पसरणारा हा मानी, स्वाभिमानी देश म्हणून प्रसिध्द आहे. माडगूळकरांच्या तिथल्या वास्तवामुळे तिथला निसर्ग, तिथला प्रदेश, तिथली माणसे, तिथल्या माणसांची सुखदु:खे , दैनंदिन घटना हयांचे वास्तव दर्शन 'माणदेशी माणसे' मधून घडते. तिथले जिवन जसे आहे तसे ते या कथासंग्रहात व्यक्त होते. या प्रदेशातील जी माणसे तीच या कथेतील माणसे त्यांच्या जिवनाची जी भाषा तीच या कथेची भाषा,'' माणदेशी जिवनाशी ही कथा इतकी एकरुप झालेली आहे की तिथली माणसेच आपापली गोष्ट सांगत आहेत असे वाटते.''[१] माडगूळकर सभोवतालचा परिसर व तिथले जीवन वास्तवस्वरुपात व्यक्त करतात.

**'माणदेशी माणसे' मधील माणसांचे वैविध्यपूर्ण दर्शन :-**

''माणदेशी माणसे'' मधली पात्रे वैविध्यपूर्ण आहेत.काही माणसे साधी, भोळी, निर्व्याज्य आहेत. तर काही अत्यंत बेरकी, इरसाल, आहेत. धर्मा रामोशी त्याच्या तरुणपणी, रात्रीच्या वेळेला निवेदकाच्या आईचे हरविलेले सोण्याचे फूल हिमतीने जावून आणून देतो. झेल्या मास्तरांना सर्व घरगुती कामात मदत करतो. नामा मास्तर तमाशाला जीवन सर्वस्व मानतो. मुलाण्याचा बकस काका-काकीचे अत्याचार सहन करतो. शिवा माळी गरीबीमुळे चोरीकरीता प्रवृत्त होतो. शेवटी पश्चातापही व्यक्त करतो. तांबोळयांची खाला विधवा असूनही धैर्याने प्रपंच चालविते गरीब रघू कारकून परिस्थितीने गांजला असतो. बीटा काका शरीराने अशक्त असतो. मुलाच्या मृत्यू ने कोसळतो. अर्धवट गणा भापट्या झटपट श्रीमंत होण्याच्या नादात स्वत:वर संकटे ओढवून घेतो ही साधी, भोळी निर्वाज्य मनाची माणसे. तर शिदा चांभार, कोडिंबा गायकवाड, बाबाखान दरवेशी, नरसू तेली, ही आडदांड, बेरकी, इरसाल पात्र म्हणून दृष्टीस पडतात. माडगुळकर अलिप्तपणे पण समरसून त्यांची व्यक्तीमत्वे जीवंत करतात. ''ही माणसे त्यांच्या वाटयाला आलेली दु:खे, भोग निमुट पणे सोसतात. माणदेशातली ही साधी, सरळ, सोशिक आाणि पक्की बनेल, इरसाल अशी सर्व प्रकारची माणसे अतंर्बाहय रुपरेखेसह उभी करण्यात माडगूळकरांचा हातखंडा आहे''[२] हेही आपल्या लक्षात येते.

**'माणदेशी माणसे' मधील माणसांची दु:खे :-**

'माणदेशी माणसे' मधली माडगूळकरांची पात्रे आयुष्यात दु:,खाने वेढलेली आहेत. गरीब धर्मा रामोशी मुलीला वस्त्र घेऊ शकत नाही. निरागस झेल्या मास्तरांच्या बदलीमुळे दु:खी होतो. रामा मैलकुलीची पत्नी दारिद्रयामुळे घर सोडून जाते. मुलाण्याचा बकस काका-काकीच्या अत्याचाराने दु:खी असतो. बण्या बापूचे घर जाळल्या जाते. शिवा माळी नाहक चोरिच्या मामल्यात तुरुंगात जातो आणि पत्नी व मुले त्याला सोडुन जातात त्यामुळे दु:खी होतो. रघु कारकून प्रपंच चालवितांना मेटाकूटीस येतो. बिटा काका एकूलत्या एक मुलाच्या मृत्यूने आत्यंतीक दु:खी होतो. ''हया पात्रांचे हे दु:ख पुष्कळदा दारिद्रयाच्या हातात हात घालुन हिंडत असते. पण कधी ते एकटेही फिरते आणि माणसाची जीवने तुडवित निघून जाते''[३] दु:खाचे वैविध्येपूर्ण पण वास्तवस्वरूपातील दर्शन माडगूळवर इथे घडवितात.

**'माणदेशी माणसे' मधली निवेदन पध्दती :-**

माणदेशी माणसे मधली निवेदन पध्दती साधीच आहे.सरळपणे कालानुक्रमाने माडगूळकर निवेदकाच्या माध्यमातून प्रसंग सांगत जातात. स्वत:चे व्यक्तित्व त्यावर न लादता माणदेशाचे संपूर्ण जीवन ते वस्तुनिष्ठपणे चितारतात. विशेष म्हणजे त्यांनी जूने साहित्यसंकेत झूगारणारी विशूध्द वास्तववादी भूमिकेतुन 'माणदेशी माणसे' ची निवेदन पध्दती साकारली आहे. कथेतील व्यक्तीचे तिथल्या निसर्ग दृश्यांचे मोजक्या शब्दात रेखीवपणे ठसठशीत केलेल वर्णने ही हया निवेदन शैलीची वैशिष्टे लक्षात येतात. माडगुळकरांच्या निवेदन शैलीच्या सामथ्यामुळे ''माणगंगेच्या परिसरातील व्यक्तींचे दारिद्रय, त्यांचा भोळेपणा, त्यांची कणखर वृत्ती त्यांचा अडाणीपणा व विकारसुलभता, त्यांच्या समजुती व त्यांच्या मनात दडून राहिलेला मानवतेचा अंश यामुळे आपण माणदेशाच्या परिसरात वावरत आहोत की काय असा भास होतो''[४].

**'माणदेशी माणसे' मधील ग्रामीण संवाद :-**

माणदेशी माणसे मधील निवेदकांचे निवेदन प्रमाण मराठी भाषेत आहे. तर संवाद मात्र माणदेशी ग्रामीण भाषेत व्यक्त केलेले आहेत. उदा.''आंब बघ कुठे मिळाला तर. तुझ्या चुलत्याच्या पोटात दुखतय ''.( पृष्ठ ३),'टेका हेच्यावर, का येरवाळी पाय वळवल गरीबाकडे (पृष्ठ ४),'लई दिस झाल!मास्तर,त्यो साळतच येत न्हाई!''( पृष्ठ १२),'म्हस मेली देवा आता दूभत न्हाई घरात. (पृष्ठ १५) 'तस नव्ह दादा! तुम्ही एकल्यापुरत आनल्यात' (पृष्ठ २६)'पण दादा, साळा शिकावी आन पोटाला काय खावजी' (पृष्ठ २८),'धाड बडवली त्या मास्तराची. लेकर बाळ होती का न्हायती' त्येला' (पृष्ठ ३५),'शेरड जात्याल माजी'(पृष्ठ ४३),'कशाचे खंड घेऊन बसलाय राव'( पृष्ठ ६१),'का बिघडली जी आणली म्हणून? आगीत जळूनच गेली असती ( पृष्ठ ७०),' 'बेटा बंद कर तु बासरी, राती वाजवू नये! ( पृष्ठ ८६),'आर तिच्या बाइली हे बी खर हाय की! काडी लावली की सोन,घर सोन्यान भरल? ( पृष्ठ १६८) प्रस्तुत संवादामधुन ग्रामीण माणदेशी भाषा, वाक्प्रचार, आणि अल्पाक्षर रमनियत्व ही भाषा वैशिष्टे ही दृष्टीस पडतात.

**'माणदेशी माणसे' मधली 'प्रतिमासृष्टी':-**

माडगूळकरांची माणदेशी माणसे मधली भाषाशैली वास्तवाचा कलात्मक वेध घेणारी आहे. चपखल प्रतिमा, प्रतीके, म्हणी, वाक्प्रचार यांनी ही भाषा नटलेली आहे. कथेचे सामर्थ्य दृगोचर करतांना त्यांनी पुढील प्रतिमा उपयोजिल्या आहेत. उदा. त्याचे शरीर आता विरल्या वस्त्राप्रमाणे जीर्ण झाले आहे. 'वाघाला दरवेशी नेतो ,तसे शिपाई त्याला चालवित हाते'.'कोंडिबान आपली खोंडागत गर्दन फिरवली ','मेलेल्या उंदराला शेपटी धरुन उचलाव तस त्यांन केलं', 'बिथरल्या खोंडासारखा उभा होता', 'त्याच्या मनाची कवाड खोलली गेली होती', 'पण अजून खैराच्या खोंडासारखा चिवट', 'पिंढऱ्यांचे गोळेही तसेच वरवंटयासारखी कठिण', ' आपला वाघासारखा जबडा उघडून गुरगुरला', 'भेदरल्या सशावानी काळीज झाले'.'वैदूच्या कुायागत त्यांनी तिला येरगटली','तोडल्या झाडासारखा गणा खाली पडला'.

**समारोप:-**

माणदेशी माणसे मधुन जीवन वास्तवाचे कलात्मक दर्शन माडगूळकरांनी घडविले आहे. कीस्से, हकीकती यांच्या व्दारे मानवी मनाचे विहंगम दर्शन इथे घडते. उच्च प्रतिभाशक्ती, विलक्षण शब्द सामर्थ्य, सरळ, साधी, सोपी भाषा शैली, हुबेहुब वास्तव व्यक्तीरेखाटन हया वैशिष्टयांसह आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत माडगुळकरांच्या माणदेशी माणसे हया निर्मितीने आपले स्वतंत्र असे 'नव'रूप सिध्द केले आहे. म्हणूनच नव कथाकारांत व्यंकटेश माडगूळकरांचे नाव आदराने घेतले जाते.

**संदर्भ सूची :-**

१. इंदूमती शेवडे: मराठी कथा: उगम आणि विकास, सोमैया पब्लिकेशन्स ,मुंबई,प्र.आ. १९६३, पृष्ठ ३९५

२. दा.वि.कुलकर्णी:-मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद, स्वाध्याय महा. पुणे,प्र.आ.१९७६, पृष्ठ ३७८

३. गंगाधर गाडगीळ: खंडक आणि पाणी, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्र.आ.१९६० पृष्ठ ३१९

४. म.ना.अदवंत: प्रदक्षिणा भाग १,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, सहावी आवृत्ती १९७६, पृष्ठ १७३

**संदर्भग्रंथ :-**

१. म,ना.अदवंत: प्रदक्षिणा भाग १,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, सहावी आवृत्ती १९७६,

२. दा.वि.कुलकर्णी:-मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद, स्वाध्याय महा पुणे,प्र.आ.१९७६

३. गंगाधर गाडगीळ :- खडक आणि पाणी, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्र.आ. १९६०

४. श्रीराम गुंदेकर :- ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे. प्र.आ. १९९९

५. सुधा जोशी :- कथा संकल्पना आणि समीक्षा , मौज प्रकाशन मुंबई, प्र.आ. २०००

६. व्यंकटेश माडगुळकर:- 'माणदेशी माणसे' कॉंन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे, पूनर्मुद्रण १९९६

७. इंदूमती शेवडे: मराठी कथा: उद्गम आणि विकास, सोमैया पब्लिकेशन्स, मुंबई, प्र. आ १९७३